# मेट्रो ३ चा होणार विस्तार

**मुंबई : पुढारी वृत्तसेवा**

कारडेपो अभावी रखडलेल्या, खर्च वाढलेल्या मेट्रो ३ प्रकल्पाला गती देण्याचे काम सूर असतानाच या प्रकल्पाचा विस्तार करण्याचा विचार सुरु आहे. हा मेट्रो मार्ग दक्षिण मुंबईत कफ परेड ते नेव्ही नगरपर्यंत नेण्याच्या दृष्टीने हालचाली सुरु आहेत. विस्तारामुळे मेट्रो ३ वर आणखी दोन हजार कोटी रुपयांचा भार पडण्याची शक्यता आहे.

मूळ मेट्रो ३ मार्ग कुलाबा- वांद्रे -सिप्झ असा आहे. हा मार्ग पूर्ण होण्यासाठी आणखी किमान दोन वर्षे लागणार आहेत. कारडेपोचे काम रखडल्यामुळे मधील काळात प्रकल्पाचा खर्च अंदाजे १० हजार कोटी रुपयांनी वाढल्याचे सांगण्यात येते. त्यातच आता प्रकल्पाचा विस्तार करण्याची योजना आखली जात आहे. त्यासाठी लवकरच विस्तृत प्रकल्प अहवाल तयार करण्याचे काम हाती घेतले जाणार आहे. कफ परेड ते नेव्ही नगर असा विस्तार प्रस्तावित असून तो दोन किमीच्या पट्ट्यात होईल. त्यासाठी किमान दोन हजार कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. या विस्तारामुळे प्रवासी संख्येत २५ हजार प्रवासी वाढतील, असा अंदाज आहे. म्हणजेब्या ओट्यातील एवढे प्रवासी मेट्रोने प्रवास करतील असा ठोकताळा बांधला जात आहे.

मेट्रोच्या होणाऱ्या विस्तारामुळे खर्चात आणखी वाढ होईल. मात्र कफ परेड ते नेव्ही नगर भागातील लोकांना सुविध उपलब्ध होत असेल तर आणखी थोडा खर्च सोसला तर त्यात वावगे काय, असे मत मेट्रो ३ च्या अधिकाऱ्याने व्यक्त केले.

## आणखी दोन हजार कोटींचा भार



● कफ परेड ते नेव्ही नगर या परिसरातील लोकांना बस आणि टॅक्सी हे वाहतुकीचे पर्याय आहेत. उपनगरात यायचे झाल्यास उपनगरीय रेल्वेचा पर्याय आहे. या लोकांना मेट्रोचा पर्याय मिळावा, यासाठी विस्ताराची योजना आखली जात आहे. मेट्रोमुळे दक्षिण मुंबईचा सर्व पट्टा मेट्रोच्या क्षेत्रात येईल. परंतु व्यावहारिक दृष्ट्या हा विस्तार चांगलाच खर्चिक ठरणार आहे. त्यामुळे मेट्रो ३ ला आणखी निधीची तरतूद करावी लागेल. आधीच मेट्रो ३ चा खर्च ३० हजार कोटींच्यावर गेला आहे.